
# बोबो नांवाचा रोबो आणि इतर मजेदार कविता



सत्यजित खारकर

**ऋणनिर्देश :**

सौ.अनुपमा धारकर,

श्री.दिलीप धारकर,

सौ.रेखा नायक,

डॉ.सुरेश नायक,

सौ.विभा तांबे,

श्री.सुहास तांबे,

सौ.क़ल्पना जोशी,

श्री.विवेक जोशी,

सौ.शैलजा नंदकिशोर मुळे,

श्री. मंगेश मुळे.

**© 2014 Satyajeet Kharkar**

**Book Available at : www.anmolmovies.com**

**CONTACT :**

**SATYAJEET KHARKAR,**
N-1, B-162,
BHAKTINAGAR, CIDCO,
AURANGABAD - 431003.

Phone :
+91 240 2482487,
Mob. : 9823044795
e-mail -
kharkar@gmail.com,
dr.kharkar@gmail.com

# बोबो नांवाचा रोबो आणि इतर मजेदार कविता

सत्यजित खारकर

लाडक्या आदित्य आणि जगातल्या
सगळ्या छोट्या मुला-मुलींसाठी

मनोगत ..................................................३

टिक टिक टॉक टॉक ....................................४

बोबोची आंघोळ ........................................६

बोबोचं फेवरेट गाणं ....................................७

सांगा टोपी कुणाची ? .................................८

माझा मित्र बोबो ......................................१०

थेंब गेला फांदीवर ....................................१२

मऊ मऊ बाळ ..........................................१३

आजोबा आजोबा मला गोष्ट सांगा ................ १६

ढगोबा ...................................................२०

बोबोची शेळी रुसली .................................२५

सुपर म्हैस .............................................२८

छान रंग भरा ..........................................३०

# मनोगत

सप्रेम नमस्कार,

आपली मराठी भाषा किती सुंदर आहे हे आपल्या नव्या पिढीला कळावे आणि त्यांना मराठी वाचनाची गोडी लागावी ह्या साठी हा एक प्रयत्न. आशा आहे चार ते नऊ वयोगटातील मुलां-मुलींसाठी लिहिलेल्या या कविता आपणा सर्वांना आवडतील.

आपला अभिप्राय मला जरूर इमेल करून कळवा. आपलं मनोगत ऐकायला मला नक्कीच आवडेल. माझा इमेल आहे, anmolmovies@gmail.com

कळावे आपला


सत्यजित खारकर

शिकागो


19 / Jan / 2014


© 2014 Satyajeet Kharkar



Book Available at : www.anmolmovies.com

# टिक टिक टॉक टॉक

गोल गोल पाहा नाणे
घोडे दादा म्हणा गाणे
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक

घोडे दादा म्हणा गाणे
ही घ्या भेट नवे नाणे
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक




दादा खुश नवे नाणे
सोने विकत घेऊ म्हणे
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक

सोनार भाऊ सोने दे
हे एक नाणे तुला घे
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक



सोनार म्हणे नाणे खोटे
पोलीस आता येती मोठे
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक

घोडा म्हणे पळा पळा
सोने नको मला मला
टिक टिक टॉक टॉक
टिकी टिकी टॉक टॉक

# बोबोची आंघोळ

बुड बुड बुड भागिरथी
पाणी पाणी मज्जा किती

फुर फुर फुर पाणी उडवा
डम डम डम तांब्या बडवा

फर फर फर फेस उडे
इकडून तिकडे चोहीकडे

थुई थुई थुई जलधारा
पाण्यामध्ये मज्जा करा



# बोबोचं फेवरेट गाणं

उलू मिलू बोबो पीलू
चिकू मिकू ऊची मूलू
गुबू गुबू गालू गालू
मिचू मिचू डोळे गोलू



पिपी पिशी कोशी बोशी
मिमी उशी मोशी मोशी
ललू ललू लाडू गालू
गडू गडू गोडू गोलू

मऊ मऊ बीबी टाऊ
गजू गजू गोडू गावू
हकू चकू हीकू चीकू
गोडु गालु मूकू घेवू

# सांगा टोपी कुणाची ?

लाल टोपी कुणाची ?
केचप मधल्या टोमॅटोची
तिखट तिखट मिरचीची



पिवळी टोपी कुणीची ?
गोड गोड केळ्याची
पिकलेल्या आंब्याची




हिरवी टोपी कुणाची ?
झाडा वरच्या कैरीची
आंबट चिंबट लिंबाची



निळी टोपी कुणाची ?
समुद्राच्या पाण्याची
उंच उंच आभाळाची



पांढरी टोपी कुणाची ?
साबणाच्या फेसाची
गायीच्या दुधाची



काळी टोपी कुणाची
दूध देणाऱ्या म्हशीची
बोबोच्या गोल डोक्याची




# माझा मित्र बोबो

हा बोबो माझा फ्रेंड
फ्रेंड म्हणजे मित्र
मित्र म्हणजे दोस्त
दोस्त म्हणजे ?
पुन्हा फ्रेंड !

बोबो आहे रोबो
रोबो म्हणजे काय ?
खाली डोकं वर पाय
अहो असं करताय काय ?

बोबो गणितात फार हुशार
पाढे म्हणतो भारंभार
मराठी कन्नड तामिळ तुलू
दोनशे भाषा शकतो बोलू




काय म्हणतो बोबो

आला तरी कूठून ?


सिक्रेट आपलं बरका’

ऑक्टोसोरस ग्रहावरून



# थेंब गेला फांदीवर

आला रे जोरात पाऊस
ओली झाली सारी फुले
इवला इवला एक थेंब
पहाना कसा मस्त झुले



एक फांदी म्हणे थेंबा
ये ना आपण करू दंगा
हसू खेळूया पोटभर
घेईन तुजला खांद्यावर

थेंब बसे मग फांदीवर
उड्यामारी तो पोटभर
या रे झुला आपण खेळूया
खुदु खुदु खूप खूप हसुया



# मऊ मऊ बाळ

छोटी छोटी बोटं
कापसाची शेतं

पिटी पिटी डोळे
सोनुले सोनुले

चिंगु मिंगु नाक
किती पहा राग

गब्बू गब्बू गाल
कसे लाल लाल


मऊ मऊ बाळ
मोत्याची माळ



# ढगांची झाली फजिती

दोन ढगोबा काळे काळे
त्यांना मोठे मोठे डोळे
मोठ्ठे मोठ्ठे दोन कान
कुठे हो गेली यांची मान ?

एक लठ्ठ दोन मठ्ठ
पाणी पी पी पोट तट्ट
सदानकदा यांची कुस्ती
काम नको फक्त मस्ती



ढगोबांनी विचार केला
टक्कर टक्कर खेळूया
आपण मज्जा करूया

अक्कर मक्कर
चक्कर चक्कर
ढगोबांची दोन
जोरात टक्कर




धडाम धडाम
कडाम कडाम



टक्कर झाली जोरात
पाऊस पडला शेतात
ओली झाली सारी फुले
मजेत हसती पहा मुले

# आजोबा आजोबा मला गोष्ट सांगा

आजोबा आजोबा मला गोष्ट सांगा
तुमच्या लहानपणीची मज्जा सांगा



जेव्हा लहान होता तुम्ही
तेव्हा होती का हो मोटर ?
बाबा तुमचा तुम्हाला
मारायचा का चक्कर ?

सांगा शाळेत तेव्हा
तुम्ही जायचा का ?
छान छान गाणी
तुम्ही गायचा का ?

लहानपणी धपाटा
तुम्ही सांगा खाल्ला का ?
खोडी केली म्हणून
बाबा कधी बोलला का ?



लहान तुम्ही होता तेव्हा
आज्जी कुठे होती ?
लग्न झालं तेव्हा
आज्जी अश्शीच गोड होती ?

आजोबा आजोबा मला गोष्ट सांगा
तुमच्या लहानपणीची मज्जा सांगा

# टॉमी टिल्लू

टॉमी टॉमी टिल्लू
कुत्र्याचं पिल्लू
मागे मागे येते
गरम गरम दुध पिते



टॉमी टॉमी टिल्लू
कुत्र्याचं पिल्लू
रंग छान भुरा भुरा
भु-भु गाणे गोड गळा

टॉमी टॉमी टिल्लू
कुत्र्याचं पिल्लू
जोरात गोल फिरते
मजेत गाल चाटते

टॉमी टॉमी टिल्लू
कुत्र्याचं पिल्लू
मला पाहून हसते
शेपूट बघ हलवते




# ढगोबा


अहो अहो ढगोबा
कुठे हो निघालात ?
घाईघाईने असे
कुठेशी चाललात ?

कामं आहे फार
बोलू नका मला
जातो आहे बघा
दूर मी गावाला

अहो अहो ढगोबा
आज नकाच जावू
पुरणपोळी ताजी
आपण दोघे खाऊ




निघालो मी एकदा
कि थांबतच नसतो
पुरणपोळी ताजी
मग एखादी खातो



बकाबका खाल्ल्या
पोळ्या मग शंभर
पुरण खाण्यात हे
ढगोबा एक नंबर

ढगोबाजी खाऊन
फारफार दमले
विसरून सगळे काम
ढाराढूर झोपले



# घड्याळ साहेब



ओ मिस्टर घड्याळ साहेब
सांगा काय करताय ?
नऊ वाजले सकाळचे
अजून झोपा काढताय ?

ओ मिस्टर घड्याळ साहेब
सांगा काय करताय ?
वाजले बारा दुपारचे
अजून दात घासताय ?

ओ मिस्टर घड्याळ साहेब
सांगा काय करताय ?
वाजले सहा कधीचे
बाराचे ठोके देताय ?

ओ मिस्टर घड्याळ साहेब
सांगा काय करताय ?
वाजले बारा रात्रीचे
किती टिकटिक करताय ?



# एक थेंब पाण्यात पडला

एकदा एक थेंब पाण्यात पडला
वाचवा वाचवा असे ओरडला




पाण्यात होता डॉल्फिन मासा
म्हणे पाण्यात टपकलास कसा ?

काय सांगू ढगामध्ये माझं घर
चांदोबाशी बोलत असे रात्रभर



एक विमान रस्ता बघा चुकले
घराला पहा धडक मारून गेले


धक्क्यानी तसा खाली आलो
थंडगार पाण्यात डुबुक पडलो



# बोबोची शेळी रूसली

बोबोची शेळी रूसली
झाडावर जावून बसली

शेळी शेळी खाली ये
हा एक पैसा तुला घे
पैसा घेवून करू काय ?
पैसा ठेवायला पर्स नाय



शेळी शेळी खाली ये
हि बघ पर्स तुला घे
पर्स घेवून करू काय ?
पर्स ठेवायला कपाट नाय



शेळी शेळी खाली ये
हे बघ कपाट तुला घे
कपाट घेवून करू काय ?
कपाट ठेवायला घर नाय




शेळी शेळी खाली ये
हे बघ घर तुला घे
घर घेवून करू काय ?
घरात एकटीच फिरू काय?



# सुपर म्हैस

बोबोची मैत्रीण सुपर म्हैस
रंगाने गुलाबी फार नाईस


एकदा काय झाली मजा
म्हैस म्हणे पाठीवर बसा
मी निघाले मंगळावर
दुध हवे त्यांना लौकर



सतरा रात्र चोवीस तास
इतका केला बघा प्रवास
मंगळावरती मोठा मॉल
मधे उभा आमचा स्टॉल



शेळी शेळी खाली ये
हा बघ नवरा तुला घे
नवरा घेवून करू काय ?
त्याला खायला घालू काय ?




शेळी शेळी खाली ये
हा बघ खाऊ तुला घे
खाऊ बघून कळी खुल्ली
टुणकन शेळी खाली आली
बोबोच्या शेळीची गोष्ट संपली



सुपर म्हशीनं दूध दिलं
बोबोनी बाटलीत भरलं
मी त्यावर लेबल लावलं
पैसे रोख घेवून विकलं

दोन हजार चारशे
इतके मिळाले पैसे
पैसे घेवून घरी आलो
ढाराढूर झोपून गेलो !



# छान रंग भरा



# छान रंग भरा



# छान रंग भरा



Images used in this book are licensed and © Graphics Factory.com

© 2014 Satyajeet Kharkar
Book Available at : www.anmolmovies.com

Images used in this book are licensed and © Graphics Factory.com

PRINTED IN INDIA
PRINTED AT SARASWATI OFFSET & PRINTING PRESS
AURANGABAD - 431001(M.S.) * +91 240 2328572

# Childrens Poetry in Marathi
# By Satyajeet Kharkar

## बोबो नावाचा रोबो आणि इतर मजेदार कविता

### मऊ मऊ बाळ



छोटी छोटी बोटं
कापसाची शेतं
पिटी पिटी डोळे
सोनुले सोनुले
चिंगु मिंगु नाक
किती पहा राग
गब्बू गब्बू गाल
कसे लाल लाल
मऊ मऊ बाळ
मोत्याची माळ

– सत्यजित खारकर







© 2014 Satyajeet Kharkar
Book Available at : www.anmolmovies.com